आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार, दिनांक ०९ जुलै २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. पॅरिस ऑलिम्पिक उद्घाटन समारंभात भारताच्या पथकाचं नेतृत्व नेमबाज गगन नारंग करणार-पी.व्ही.सिंधू आणि अचंता शरत कमल असतील ध्वजवाहक.

2. राज्यात बनावट पॅथॉलोजी लॅबवर नियंत्रण आणि कारवाईसाठी स्वतंत्र कायदा आणण्याची मंत्री उदय सामंत यांची विधानसभेत घोषणा.

3. एम्स नागपूर-सिकलसेल **ॲ**निमिया रुग्णांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सज्ज.

4. बुलढाणा जिल्हा वगळता विदर्भ विभागातील पात्र पुरुष उमेदवारांसाठी नागपुरात येत्या 27 जुलै ते 05 ऑगस्ट दरम्यान सैन्य भरती मेळावा.

****

<u>पॅरिस ऑलिम्पिक</u>

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भारताच्या पथकाचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज गगन नारंग करणार आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं नारंग याची निवड शेफ डी मिशन (सीडीएम) म्हणून केली आहे. यापूर्वी मुष्टियोद्धा मेरी कोम या पथकाचं नेतृत्व करत होत्या. मात्र त्यांच्या राजीनाम्यानंतर या पथकाचं नेतृत्व नारंग करतील, अशी माहिती भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी दिली. या पदावर निवड झालेल्या खेळाडूवर पथकातील खेळाडूंची काळजी घेणं आणि आयोजन समितीशी समन्वय साधण्याची जबाबदारी असते. पी.व्ही.सिंधू ही पथकाची ध्वजवाहक असेल आणि टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल तिच्या सोबत असेल.

<u>विधानसभा</u>

राज्यात बनावट पॅथॉलोजी लॅब वर नियंत्रण आणि कारवाईसाठी स्वतंत्र कायदा आणण्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी केली आहे. आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. याबाबतचा प्रश्न सुनील राणे यांनी उपस्थित केला होता, त्याला उत्तर देताना,सामंत यांनी, या कायद्यात दर नियंत्रण, कलेक्शन सेंटर नोंदणी तसंच फौजदारी कारवाईची देखील तरतूद असेल, अशी माहिती दिली. कायदा अस्तित्वात येईपर्यंत राज्यभर जिल्हावार पथकं तयार करून पॅथॉलोजी लॅब ची तपासणी केली जाईल, तसंच कायदा आणण्यासाठी वेळ लागत असेल तर सध्याच्या नर्सिंग कायद्यात सुधारणा करून कारवाई केली जाईल अशी माहितीही उदय सामंत यांनी दिली.

दरम्यान, राज्यात हजारो कोटींचा अँब्युलन्स घोटाळा झाला आहे. यासाठी दिलेली १० हजार कोटींची निविदा रद्द करून विशेष तपास पथकाच्या मार्फत चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. अर्थसंकल्पावरील मागण्यावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते. राज्याची खुलेआम लूट सुरू असून ३० टक्के दरान कमिशन मागितल जात असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

चंद्रकांत पाटील

महाराष्ट्र शासनान, राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, अशा सर्व मुलींची १०० टक्के फी शासन भरेल, अशी घोषणा करुन त्याची अंमलबजावणी होण्याबाबत अर्थसंकल्पीय भाषणात घोषणा केली गेली. त्यानुसार मंत्रीमंडळाच्या बैठकीत रितसर मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या केवळ मुलींचीच नाही तर मुलांचीही १०० टक्के फी भरण्याबाबत शासनान यापूर्वीच निर्णय घेतला आहे, अशी माहिती आज उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे दिली.

विधानपरिषद

राज्यात कारखान्यांमध्ये होणाऱ्या स्फोटाच्या आणि आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, औद्योगिक सुरक्षा विभागानं केलेल्या कार्यवाहीचा लेखाजोखा कामगार विभागानं हिवाळी अधिवेशनात मांडावा असे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आज विधानपरिषदेत दिले. नागपूरमधील धामणी इथल्या चामुंडी एक्सलोसिव्ह या फटाक्यांच्या वाती बनवण्याच्या कारखान्यात आग लागून ९ कामगारांचा मृत्यू झाल्याचा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी यांनी आज लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून उपस्थित केला. सगळया मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून दहा लाख रुपये देण्यात आले असून कारखाना व्यवस्थापनामार्फत २५ लाख रुपयांचा डिमांड DRAFT दिल्याची माहिती कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी यावेळी दिली. राज्य सरकारनं घेतलेल्या, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग पुनर्रचनेच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. या पुनर्रचनेमुळे शेतकऱ्यांना पशुसेवा देणाऱ्या जवळपास एक लाख वीस हजार लघु पशुवैद्यकीय व्यावसायिकांच्या रोजगारावर विपरीत परिणाम होत असल्याबद्दल आमदार मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. सर्व संबंधित संस्था-संघटनांसोबत यासंबंधी आज बैठक घेण्यात येणार असून त्यांचं म्हणणं ऐकून घेऊन निर्णय घेतला जाईल, असं विखे पाटील यांनी स्पष्ट केलं. तसंच पशुवैद्यकीय

अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ३० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल, अशी घोषणा आमदार अभिजित वंजारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याला उत्तर देताना त्यांनी केली.

<u>मुंबई रेल्वे स्थानक नाव बदल</u>

मुंबई लोकल रेल्वेमार्गांवरच्या विविध स्थानकांची नावं बदलण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेन आज एकमतान मंजूर केला. मध्य रेल्वेमार्गावरच्या करी रोड रेल्वेस्थानकाचं नाव लालबाग मुंबादेवी रेल्वेस्थानक, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गांवरच्या सॅन्डहर्स्ट रेल्वेस्थानकाचं नाव डोंगरी रेल्वेस्थानक, पश्चिम रेल्वेमार्गावरच्या मरीन लाइन्स रेल्वेस्थानकाचं नाव बदलून मुंबादेवी रेल्वेस्थानक, चर्नी रोड रेल्वेस्थानकाचं नाव गिरगाव रेल्वेस्थानक करण्याची शिफारस या प्रस्तावात करण्यात आली आहे. तसंच हार्बर रेल्वेमार्गावरच्या कॉटन ग्रीन रेल्वेस्थानकाचं नाव काळा चौकी रेल्वेस्थानक, डॉकयार्ड रेल्वेस्थानकाचं नाव माझगाव रेल्वेस्थानक, तर किंग्ज सर्कल रेल्वेस्थानकाचं नाव बदलून तीर्थंकर पार्श्वनाथ रेल्वेस्थानक करण्याची शिफारसही या प्रस्तावात आहे. मंत्री दादाजी भुसे यांनी हा प्रस्ताव मांडला आणि सभागृहाने आवाजी मतदानाने या प्रस्तावाला मंजुरी दिली.

<u>एम्स सिकलसेल</u>

एम्स नागपूर इथं नुकतंच ओपीडी कॉम्प्लेक्समध्ये सिकलसेल ॲनिमिया सेवेचं उद्घाटन संचालक प्रशांत पी जोशी यांनी आज केलं. एम्स नागपूर सिकलसेल ॲनिमिया असलेल्या रुग्णांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सज्ज आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. या सुविधेमुळे सिकलसेल रुग्णांना कोणत्याही प्रतीक्षा कालावधी शिवाय ओपीडी मध्ये डॉक्टरांचा सल्ला घेता येणार असून त्यासाठी विशेष नोंदणी काउंटर सुरु करण्यात आलं आहे. सिकलसेल ॲनिमिया रुग्णांना प्राथमिकता देण्यासाठी हॉस्पिटलच्या इलेक्ट्रॉनिक रांग व्यवस्थापन प्रणाली मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. ओपीडीच्या वेळेत विशेष औषध आणि लसींच मोफत वितरण करण्यासाठी ओपीडी मध्ये एक विशेष दवाखाना देखील स्थापन करण्यात आला आहे. याशिवाय आपत्कालीन व्यवस्थापनासाठी विशेष खाटा राखीव ठेवण्यात येत आहेत, असं त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन ही मोहीम 2023 मध्ये पंतप्रधानांनी सुरु केली होती. राष्ट्रीय आरोग्य अभियानान्तर्गत सन 2047 पर्यंत सिकलसेल अनुवांशिक संक्रमण दूर करण्याच्या उद्दिष्टान AIIMS नागपूर आपली दीर्घकालीन बांधिलकी जपत आहे.

## सैन्य भरती/पोलीस भरती

बुलढाणा जिल्हा वगळता विदर्भ विभागातील पात्र पुरुष उमेदवारांसाठी सैन्य भरती मेळावा येत्या 27 जुलै ते 05 ऑगस्ट या कालावधीत नागपूरच्या मानकापूर इथल्या विभागीय क्रीडा संकुल इथं आर्मी रिक्रूटिंग ऑफिस, नागपूर यांच्या अंतर्गत आयोजित करण्यात येणार आहे. रॅलीत सहभागी होण्यासाठी निवडलेल्या उमेदवारांची प्रवेशपत्र www.joinindiaarmy.nic.in या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहेत. दरम्यान, बुलढाणा जिल्हा पोलिस दलाच्या आस्थापनेवरील सन 2022-23 मधील रिक्त असलेल्या 125 पोलिस शिपाई पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा शनिवार दिनांक 13 जुलै रोजी सकाळी 10 ते 11.30 या वेळेत चिखली रस्त्यावरील सहकार विद्या मंदिरात घेतली जाणार आहे. पात्र उमेदवारांची निवड यादी buldhanapolice.gov.in, जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षातील नोटीस बोर्ड आणि पोलीस मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## निवडणूक आढावा बैठक

महाराष्ट्रात आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, पालिका आयुक्त, पोलिस आयुक्त आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांच्या समवेत आढावा घेण्यात आला. काल झालेल्या आढावा बैठकीत भारत निवडणूक आयोगाच्या सदस्यांसमोर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केलेल्या कामकाजाच सादरीकरण केल. यावेळी आयोगाकडून जिल्हाधिकाऱ्यांनी करावयाच्या कामकाजाबाबत सूचनाही केल्या.

## हवामान

विदर्भात आज आणि उद्या सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्यने दिला आहे. दरम्यान, आज अमरावती, अकोला, आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देखील देण्यात आला आहे. तर नागपूर् सह अन्य जिल्ह्यांमध्ये माध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. याशिवाय सर्वत्र पावसाची शक्यता असल्यान सतर्कतेचा यलो अलर्ट देखील जारी करण्यात आलाय. ११ आणि १२ तारखेकडे मात्र पश्चिम विदर्भात आणि नागपूरसह, गोंदिया या जिल्ह्यात सामान्य हवामान राहण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या शेवटी नागपूरसह संपूर्ण विदर्भात पुन्हा वादळी पर्जन्यमान राहू शकतं. नागपुरात आज सकाळ पासून अधून-मधून पावसाच्या सरी बरसत असल्या तरी ढगाळ वातावरणान उकाडा वाढला आहे.